# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर जिल्हा पुणे

# अर्थशास्त्र विभाग

# शॉर्ट कोर्स (2023-24) संक्षिप्त अहवाल

महोदय,

आपल्या महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने सर्टिफिकेट कोर्स इन ऍडव्हान्स बँकिंग अँड फायनान्स कोर्स आयोजित करण्यात आला. त्याचा संक्षिप्त अहवाल खालील प्रमाणे देत आहोत:

**उद्‌घाटन समारंभ**: शनिवार दिनांक 24/02/2024 रोजी सकाळी दहा वाजता मा. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे सरांच्या अध्यक्षतेखाली अर्थशास्त्र विभागाच्या "सर्टिफिकेट कोर्स इन ऍडव्हान्स बँकिंग अँड फायनान्स" या शॉर्ट टर्म कोर्स चे उद्‌घाटन संपन्न झाले. सदर उद्‌घाटन प्रसंगी उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. एस. व्ही. धानापुणे मॅडम सुद्धा उपस्थित होते. अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. आर. एस. शिरसी यांनी प्रास्ताविक करून शॉर्ट टर्म कोर्से उद्दिष्ट विशद केले. उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे सरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे सरांनी बँकिंग क्षेत्रातील घडामोडींचा विद्यार्थ्यांनी बारकाईने अभ्यास करावा असे आवाहन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. बी. ए. वायकर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. वर्षा वाळुंज यांनी केले.सदर शॉर्ट टर्म कोर्स अंतर्गत खालील तज्ञांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

| अ.क्र | तज्ञ व्याख्यातांचे नाव | दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| 1. | प्राजक्ता मांजरे (राजगुरुनगर सहकारी बँक) | 28/2/2024 | बँकिंग क्षेत्रातील आव्हाने आणि संधी |
| 2. | प्रा.जयश्री आरुडे | 1/3/2024 | बँकिंग क्षेत्रातील गणितीय पद्धतीचा वापर" |
| 3. | प्रा. पटांगणे | 2/3/2024 | Computer Language |
| 4. | श्री विलास पोतले (शाखाप्रमुख, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, राजगुरुनगर) | 6/3/2024 | मॉडर्न टेक्नॉलॉजी इन बँकिंग सेक्टर |
| 5. | प्रा. डॉ. विकास रासकर | 7/3/2024 | Significance of English Language in IBPS Exam |
| 6. | श्री सोपान नाणेकर (मॅनेजर एचडीएफसी) | 9/ 3/ 2024 | ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी इन बँकिंग |

**Guest Lecture तज्ञांचे व्याख्यान:** अर्थशास्त्र विभागाच्या शॉर्ट टर्म कोर्स अंतर्गत गुरुवार दिनांक 7/3/2024 रोजी सकाळी अकरा वाजता प्रा. डॉ. विकास रासकर सरांचे "Significance of English Language in IBPS Exam" या विषयावर व्याख्यान झाले.

**समारोप समारंभ:** अर्थशास्त्र विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या सर्टिफिकेट कोर्स इन ऍडव्हान्सड बँकिंग एन फायनान्स या शॉर्ट टर्म कोर्स समारोप समारंभ 10/04/2024 रोजी सकाळी दहा वाजता संपन्न झाला. या समारोप प्रसंगी मा. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे सरांच्या हस्ते सदर संबंधित विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

**विशेष सत्कार समारंभ**: अर्थशास्त्र विभागाचा माजी विद्यार्थी निखिल भोगाडे या विद्यार्थ्यांची सहाय्यक कक्ष अधिकारी म्हणून नेमणूक झाल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ. शिरीष पिंगळे सरांच्या हस्ते शाल, श्रीफळ आणि ग्रंथ भेट देऊन विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे सरांनी अर्थशास्त्र विभागातील कार्यरत असणाऱ्या सर्व प्राध्यापकांचे आणि सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक आणि अभिनंदन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे हे देखील उपस्थित होते. या कार्यक्रमास अर्थशास्त्र विभागात कार्यरत असणारे सर्व प्राध्यापक उपस्थित होते. प्रा. बी. ए. वायकर, प्रा. एस. व्ही. धानापुणे मॅडम, प्राध्यापक वर्षा वाळुंज आणि विभाग प्रमुख प्रा. डॉ. आर. एस. शिरसी या सर्वांनी शॉर्ट टर्म कोर्स यशस्वी करण्यात आपली भूमिका बजावली. सदर कोर्स यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, महाविद्यालयाचे प्रबंधक या सर्वांचे मार्गदर्शन लाभले. तसेच खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्रजी बुट्टे पाटील, उपाध्यक्ष माननीय श्री नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊशेठ सांडभोर आणि सर्व संस्थेचे पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनामुळे शॉर्ट टर्म कोर्स यशस्वी संपन्न झाला. तसेच द्वितीय वर्ष कला आणि तृतीय वर्ष कला या वर्गातील अर्थशास्त्र विषयाचे विद्यार्थी अतिशय उत्कृष्टपणे मोठ्या संख्येने या शॉर्ट टर्म कोर्सचा लाभ घेतला .

प्रा.डॉ. बी. ए. वायकर

सहाय्यक समन्वयक.




विभाग प्रमुख
अर्थशास्त्र
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, जि. पुणे